## निशाण ८२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे वादपत्रात सुधारणा करण्याच्या परवानगी करिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या माध्यामातून वादीस सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ ते ४८ अ यांची नावे वगळण्याची इच्छा आहे. सदर दुरुस्ती करुन वादीस त्या अनुषंगाने वादपत्रात सुधारणा करायची असल्या कारणाने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ नियम १७ अन्वये विचारात घेतला आहे.

२. अर्जात वादीचे कथन असे की, सदर कामी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेदरम्यान आपआपसात तडजोड झालेली आहे. सदर दाव्यातील इतर प्रतिवादी म्हणजे प्रतिवादी क्र. ७ ते ४८ अ यांचेविरुध्द वादीची कसलीही तक्रार राहिली नाही. त्यामुळे सदर दाव्यातून प्रतिवादी क्र ७ ते ४८ अ यांची नावे वगळण्यात यावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. ४ ते ६ नि ८२ लगत म्हणणे देवून अर्ज नाकरला. तसेच सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. सदर अर्जास प्रतिवादी क्र. ४४ यांचेतर्फे नि ८२ लगत म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांचे म्हणणे असे होते की, सदर दाव्यात वादीची सदर प्रतिवादी विरुध्द कोणतीही मागणी नसल्याकारणामुळे दाव्यातील नाव कमी करण्यास हरकत नाही.

५. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द डिक्लरेशन व वाटपासाठीचा व पृथक कब्जासाठीचा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये नमूद दावा कलम १ मधील मिळकती या

वादी व प्रतिवादी १ ते ६ वडिलोपार्जित हक्क व वहिवाटीच्या आहेत. वादी प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे एकत्र हिंदू कुटुंब असून त्यामध्ये अदयापर्यंत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा वारसा हक्काने हक्क व अधिकार आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ वादीचे भाउ आहेत. प्रतिवादी क्र. ४ ही वादीची आई असून प्रतिवादी ५ व ६ या बहिणी आहेत. सदर दाव्यामध्ये वादीची मागणी प्रतिवादी क्र १ ते ६ यांचे विरुध्द आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र १ ते ६ यांनी कैफियत दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४४ यांनी कैफियत दाखल करुन वादीचा दावा नाकारला आहे. सदर प्रतिवादी क्र. ४४ यांच्यातर्फे सदर अर्जास म्हणणे देवून वादीची त्यांच्या विरुध्द कोणतीही मागणी नसल्याकारणाने नाव कमी करण्यास हरकत नसल्याचे सांगितले. सदर अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ वादीने निं. क्र ८३ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर दाव्यातील दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्या वडिलोपार्जित असल्याकारणामुळे व सदर मिळकतीसी प्रतिवादी क्र ७ ते ४८ अ यांचा कोणताही मालकी हक्क नसल्याकारणाने सदर प्रतिवादी क्र ७ ते ४८ अ यांची नावे त्याअनुषंगाने वगळण्याने दाव्याच्या आशयात व विषयात कोणताही बदल होत नाही.

६. मा. मुंबई उच्च न्यायालयाचे विविध न्याय निवाडयांनुसार दुरुस्ती मंजूर करण्यामागे दाव्यातील वाद परिणामकारकरित्या सोडवून दाव्यातील पक्षकाराचे हक्क ठरविणे आवश्यक आहे. कायदाच्या प्रस्तापित तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याचा गुणावगुणांचा विचार करणे जरुरीचे नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मुळ उद्देश असा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मुळ

मुद्दा शोधून खरी परिस्थीती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरुस्ती करणे तसेच कायदयाचे प्रस्तापित तत्व आहे की, वादी हा त्यांच्या दाव्याचा मास्टर असतो (Plaintiff is dominus litus). त्यामुळे सदर गोष्टीचा विचार करता वादीस प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्याबरोबर तडजोड करुन इतर प्रतिवादी क्र. ७ ते ४८ अ यांचे विरुध्द कोणत्याही प्रकाराची दाद नकोशी असल्याकारणाने वादीने सदर अर्जाद्वारे केलेली प्रतिवादी क्र. ७ ते ४८ अ यांचे नाव दाव्यातून वगळण्याच्या मागणीस परवानगी देणे संयुक्तीक वाटते. सदर दुरुस्तीमळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. किंबहूना दाव्याची योग्य निर्गती होणेस मदत होईल. तसेच सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर करणे हे दिवाणी प्रकिया संहिता ऑर्डर ६ नियम १७ मधील तत्वानुसार न्यायोचित वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र. ८२ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती मुदतीत करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

Sd/-
(एस.एस. साळुंखे)
३ रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ०५/०९/२०२४